नियमित दिवाणी दावा क्र. १९/२०२०
रामकिसन – वि–फकिरा व इतर
CNR NO. MHBU210001312020

**अर्ज नि.क.६७ वरील आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीनी दाखल करुन असे कथन केले की, दावा प्रतिवादी क्र. ०८ याने प्रकरण क्रमांक रा.प्र.क्र.एम.सी.ए.-८१/ परतापूर/२०१९-२० मध्ये दिनांक २४.०२.२०२० रोजी पारित केलेला आदेश रद्द होवून मिळण्याकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबीत असतांना वर नमुद आदेशाची अंमलबजावणी होणे कामी प्रतिवादी क्र.८ याने दिनांक २५.०५.२०२२ रोजी तसे पत्र संबंधित मंडळ अधिकारी, तलाठी व पोलिस निरीक्षक यांना दिली आहे. सदर पत्राची एक प्रत वादींना देण्यात आली आहे. पुढे असे कथन केले की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.८ याने रस्त्या संदर्भात वरीलप्रकरणात दिनांक २४.०२.२०२० रोजी पारित केलेला आदेश रद्द होवून मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.८ याने वरील प्रमाणे पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कोणताही अर्थ राहणार नाही. तरी प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपावेतो वर नमुद प्रकरणात प्रतिवादी क्र.८ याने दिनांक २४.०२.२०२० रोजी रस्त्या बाबत पारित केलेल्या आदेशास तुर्तातूर्त स्थगिती देवून वादातील रस्त्याबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश प्रतिवादी यांना देण्यात यावे अशी विनंती केली.

०२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र. ७२ अनुसार दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांचे कथन की, दाव्यासोबत वादीनी तुर्तातूर्त मनाई आदेश मिळण्याकरिता अर्ज नि.क्र.०५ दाखल केला होता. सदर अर्जास प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. परंतू, सदर अर्ज नि.क्र.०५ हा वादीने न चालविता काढून घेतलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही किंवा अशा प्रकारचा अर्ज दाखल करण्याचा वादींना कायदेशीर अधिकार नाही. पुढे असे कथन केले की, प्रतिवादींना त्यांची जमीन गटक्रमांक ९३ व

९४/२ मध्ये जाणे येणे करिता गटक्रमांक ८९ मधील अस्तित्वात असलेल्या रस्त्या व्यतिरिक्त दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. वरील वस्तुस्थितीची शहानिशा करुन प्रतिवादी क्र.८ याने रस्ता प्रकरणात तसे आदेश दिनांक २४.०२.२०२० रोजी पारित केला आहे. सध्या पावसाचे दिवस सुरु असल्यामुळे प्रतिवादींना त्यांच्या जमिनीत मशागत करुन पेरणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रतिवादींनी वर नमुद रस्ता प्रकरणातील आदेशाची अंमलबजावणी होवून मिळण्याकरिता प्रतिवादी क्र.८ कडे अर्ज दिलेला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.८ याने दिनांक २५.०५.२०२२ रोजी संबंधित मंडळ अधिकारी यांना पोलिस संरक्षण घेवून वादातील रस्ता खुला करण्याबाबत कळविले आहे. पुढे असे कथन केले की, मयत अश्रू हौसाजी कळंबे व त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाकरिता दिनांक ०६.०७.१९७७ रोजीच्या तहसीलदार यांच्या आदेशान्वये मौजे परतापूर येथील गटक्रमांक ८९ पैकी ०४.०० हेक्टर जमीन दिलेली होती. परंतू, वादी व त्याच्या कुटुंबियातील सदस्यांनी शासनाने लादून दिलेल्या शर्ती व अटींचा भंग करुन ०४.०० हेक्टर जमिनीपैकी काही जमिनीची विल्हेवाट लावली आणि काही जमिनीचे प्लॉटस पाडून विक्री केली. पुढे असे कथन केले की, प्रतिवादी क्र.८ याने दिनांक २४.०२.२०२० रोजी दिलेल्या निकालात वादी व त्याच्या कुटुंबियातील सदस्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अंतर्गत जमिनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१ चे कलम ८-ब अनुसार शासनाने लादलेल्या शर्ती व अटींचा भंग केल्याचे सिध्द झाल्याचे नमुद करुन गटनंबर ८९ मधील सर्व क्षेत्र त्यांच्या कब्जातून काढून घेवून सरकारजमा करण्याचे आदेश पारित केले आहेत. पुढे असे कथन केले की, वर नमुद आदेशाप्रमाणे अंमलबजावणी होवून गटनंबर ८९ मधील संपूर्ण क्षेत्र सरकारच्या नावे नोंद झाली आहे. पुढे असे कथन केले की, गटनंबर ८९ मधील जमिनीवर वादीचा कोणताही कब्जा राहिलेला नाही. तरी वरील सर्व कारणांचा विचार होवून अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

०३. उभयपक्षांचे कथन व त्यांच्या विधीज्ञांनी केलेल्या युक्तीवादाचा विचार करुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहेत. त्याचे निष्कर्ष मी कारणमीमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| ०२ | कोणता आदेश ? | अर्ज नामंजूर |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करिताः**

०४. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.८ याने रस्ता प्रकरण क्रमांक रा.प्र.क्र.एम.सी.ए.–८१/ परतापूर/२०१९–२० मध्ये दिनांक २४.०२.२०२० रोजी पारित केलेला आदेश रद्द होवून मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत संचिताचे अवलोकन केले असता दाव्यासोबत तात्पुरता मनाई आदेश मिळण्याकरिता अर्ज नि.क्र.०५ दाखल करण्यात आला होता. परंतु, वादींनी प्रस्तुतचा अर्ज न चालविता मुळ दाव्यासोबत चालविण्याची विनंती केली. तद्नंतर दिनांक ०९.०८.२०२१ रोजी मुद्दे कायम करण्यात आले आणि वादी पक्षाचा पुरावा सुरु झाला. पुढे असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या अर्जावरुन प्रतिवादी क्र.८ याने दिनांक २५.०५.२०२२ रोजी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांना पत्र पाठवून वर नमुद रस्ता प्रकरणातील आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहे.

०५. वादींच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वर नमुद रस्ता प्रकरणात प्रतिवादी क्र. ८ याने दिनांक २४.०२.२०२० रोजी पारित केलेला आदेश रद्द होवून मिळण्याकरिता प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्रतिवादी क्र.८ याने वरीलप्रमाणे पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे आणि प्रस्तुतचा दावा चालविण्यास कोणताही अर्थ राहणार नाही. प्रतिवादींच्या विधाज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादातील रस्त्या व्यतिरिक्त प्रतिवादींना दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, गट नंबर ८९ मधील जमीन मयत आश्रू कळंबे व वादींना शासनाने खाण्यासाठी दिलेली होती. सदर

जमिनीची मालकी शासनाची असतांना देखील वादींचे कुटुंबियांनी जमिनीची विल्हेवाट लावली. पुढे न्यायायाच्या असे निदर्शनास आणून दिले की प्रतिवादी क्र.८ याने दिनांक २४.०२.२०२० रोजी दिलेल्या निकालात तसे निष्कर्ष नोंदविले आहेत आणि गटनंबर ८९ मधील जमीनीवरील वादींचे नाव कमी करुन सदरची जमीन सरकारजमा करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहे. पुढे न्यायालयाचे असे निदर्शनास आणून दिले की प्रतिवादी क्र.८ याने दिलेल्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी होवून ७/१२ उता–यावरुन वादींचे नाव कमी होवून सरकारपक्षाच्या नावाची नोंद झालेली आहे. पुढे असा युक्तीवाद केला की, गटनंबर ८९ मधील जमीनीवर वादींचा कायदेशीर कब्जा राहिलेला नाही. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, वादातील रस्ता प्रतिवादी क्र.८ च्या आदेशाप्रमाणे खुला न केल्यास प्रतिवादींना त्यांच्या जमीनीत जावून मशागत करुन पेरणी करणे शक्य होणार नाही आणि त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

०६. प्रतिवादी क्र.८ याने वर नमूद रस्ता प्रकरणात दिनांक २४.०२.२०२० रोजी दिलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अश्रू हौसाजी कळंबे हे भूमीहीन असल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाकरिता महाराष्ट्र शासनामार्फत दिनांक ०६.०७.१९७७ रोजीच्या आदेशान्वये मौजे परतापूर येथील गटक्रमांक ८९ पैकी ०४.०० हेक्टर जमीन खाण्यासाठी दिलेली होती. पुढे असे दिसून येते की, आश्रू हौसाजी कळंबे याने वर नमूद जमिनीपैकी काही क्षेत्राची विल्हेवाट लावून शासनाने लादून दिलेल्या शर्ती व अटींचा भंग केला, असे निष्कर्ष प्रतिवादी क्र.८ याने त्याच्या आदेशात नोंदवून सदरची जमीन सरकारजमा करण्याचे निर्देश दिले. प्रतिवादी क्र.१ ते ३ याने कागदपत्र यादी नि.क्र. ७४ सोबत दाखल फेरफार क्रमांक ७२२ व गटक्रमांक ८९ च्या ७/१२ उता–यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.८ याने वरीलप्रमाणे दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी होवून गटनंबर ८९ मधून वादीचे नाव कमी होवून जमीन सरकारजमा झालेली आहे. गटक्रमांक ८९ वर सध्या वादींचा कायदेशीर कब्जा आहे हे दाखविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा वादी पक्षाने सादर केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास वादींना कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास

पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.६७ नामंजूर करण्यात आला.

SHAIKH ABDULKARIM A

Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2022.06.24 11:17:39 +0530

(अ.अ.शेख)
दिवाणी न्यायाधीश व स्तर

दिनांकः २२.०६.२०२२ मेहकर

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 22.06.2022
Date of Uploading : 24.06.2022